# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं.

**दिनांकः04.09.2026** **वारःशुक्रवार**

---

**ठळक बातम्या**

1. पृथ्वी निरीक्षणासाठी उपयुक्त ठरणाऱ्या पहिल्या छायाचित्रण उपग्रहाचं इस्रोकडून यशस्वी प्रक्षेपण.
2. ब्रिक्स देशांच्या मुख्य न्यायाधीशांची बैठक आजपासून नवी दिल्लीत.
3. परदेशी देणग्या नियमन सुधारणा विधेयकातील तरतुदींच्या परीक्षणासाठी संयुक्त संसदीय समिती स्थापन.
4. पूरग्रस्त नेपाळला भारताकडून मदतीची पुढची खेप रवाना.
5. महिलांच्या आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत हाँगकाँगवर दणदणीत मात करत भारताची उपांत्य फेरीत धडक.

**इस्रो**

भू-निरीक्षणासाठी उपयुक्त ठरणाऱ्या भारताच्या पहिल्या छायाचित्रण उपग्रहाचं इस्रोकडून आज पहाटे यशस्वी प्रक्षेपण करण्यात आलं. श्रीहरीकोटा इथल्या सतीश धवन अंतराळ केंद्रावरून GSLV प्रक्षेपकाद्वारे हे प्रक्षेपण करण्यात आलं. प्रक्षेपणानंतर सुमारे 18 मिनिटांनी हा उपग्रह निर्धारित कक्षेत यशस्वीरीत्या स्थापित करण्यात आला. या उपग्रहाद्वारे तात्काळ उपलब्ध होणाऱ्या प्रतिमांमुळं कृषी आणि आपत्ती व्यवस्थापन क्षेत्रांत देशाला मोठी मदत होईल. तसंच या मोहिमेमुळं भारताची पृथ्वी निरीक्षणाची क्षमता अधिक मजबूत होईल असं इस्रोचे अध्यक्ष व्ही. नारायणन यांनी सांगितलं.

**बेल्जियम-भारत**

भारत आणि बेल्जियम यांच्यातील द्विपक्षीय व्यापार पुढील पाच वर्षांत दुप्पट करण्याचं उद्दिष्ट निश्चित करण्यात आलं आहे, असं परराष्ट्र मंत्रालयातील सचिव सिबी जॉर्ज यांनी सांगितलं. बेल्जियमचे पंतप्रधान बार्ट डी वेव्हर यांच्या भारत भेटीबाबत ते काल प्रसारमाध्यमांशी बोलत होते. बेल्जियमच्या पंतप्रधानांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेऊन विविध मुद्यांवर चर्चा केली. पंतप्रधान मोदींनी बेल्जियममधील विद्यापीठं आणि प्रमुख शैक्षणिक संस्थांना भारतात आपली शैक्षणिक संकुलं सुरू करण्याचं निमंत्रण दिलं आहे. तसंच ब्रुसेल्समध्ये संरक्षण सह-अधिकारी नियुक्त करण्याचा निर्णयही भारतानं जाहीर केला. युक्रेन आणि पश्चिम आशियातील घडामोडींसह महत्त्वाच्या आंतरराष्ट्रीय बाबींवरही दोन्ही नेत्यांनी विचार-विनिमय केला.

**एस. जयशंकर**

रशिया-युक्रेन युद्ध संपावं यासाठी भारताचा सर्वतोपरी पाठिंबा असल्याचं परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर यांनी काल सांगितलं. युक्रेनमधील कीव्ह इथं युक्रेनचे परराष्ट्र मंत्री आंद्री सिबिहा यांची त्यांनी काल भेट घेतली. त्यानंतर बोलताना डॉ. जयशंकर म्हणाले की, हा युद्धाचा काळ नाही; कुठल्याही समस्येवर रणांगणावरील युद्धाद्वारे उपाय निघणार नाही, ही भूमिका भारत सातत्यानं मांडत आला आहे. या युद्धाचा अंत होणं आवश्यक आहे, या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बिश्केक इथं केलेल्या विधानाचा डॉ. जयशंकर यांनी पुनरुच्चार केला. अशा

संघर्षादरम्यान व्यापारी जहाजांवर होणाऱ्या हल्ल्यांकडेही डॉ. जयशंकर यांनी लक्ष वेधलं. डॉ. जयशंकर यांनी युक्रेनचे अध्यक्ष वोलोडिमिर झेलेन्स्की यांचीही भेट घेतली; सध्या सुरू असलेला संघर्ष संपवण्याच्या उपायांवर यावेळी चर्चा केली. जयशंकर सध्या युक्रेन आणि पोलंडच्या तीन दिवसांच्या दौऱ्यावर आहेत.

**क्वाड सहकार्य-विक्रम मिस्री**

परराष्ट्र व्यवहार सचिव विक्रम मिस्री यांनी काल नवी दिल्ली इथं क्वाड शेर्पांच्या बैठकीचं आयोजन केलं होतं. या बैठकीत क्वाड सहकार्य, सागरी आणि आंतरराष्ट्रीय सुरक्षा, आर्थिक समृद्धी आणि सुरक्षा, अत्यंत महत्त्वाची उदयोन्मुख तंत्रज्ञानं, मानवता सहाय्य यांसारख्या महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा करण्यात आली. हिंद-प्रशांत क्षेत्रातील तसंच प्रादेशिक आणि जागतिक संदर्भातील व्यापक घडामोडींवरही क्वाड शेर्पांनी आपले दृष्टीकोन मांडले

**ब्रिक्स**

ब्रिक्स देशांच्या मुख्य न्यायाधीशांची बैठक आजपासून नवी दिल्लीत सुरू होत आहे. भारताच्या सर्वोच्च न्यायालयाकडे या बैठकीचं यजमानपद आहे. ब्रिक्स सदस्य देश आणि अन्य भागीदार देशांमधील मुख्य न्यायाधीश, सर्वोच्च न्यायालयांचे न्यायमूर्ती आणि वरिष्ठ न्यायिक प्रतिनिधी या बैठकीत सहभागी होणार आहेत. न्यायदान प्रक्रिया, आंतरराष्ट्रीय वादांचं निवारण, तंत्रज्ञान आणि शाश्वत विकास यांसारख्या मुद्द्यांवर या बैठकीत चर्चा होणार आहे. या बैठकीच्या निमित्तानं सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत आज विविध देशांच्या शिष्टमंडळांच्या प्रमुखांशी द्विपक्षीय चर्चा करणार आहेत.

**जेपीसी**

परदेशी देणग्या नियमन सुधारणा विधेयकातील तरतुदींचं परीक्षण करण्यासाठी सरकारनं काल 31 सदस्यीय संयुक्त संसदीय समिती स्थापन केली. लोकसभेतील खासदार संजय जयस्वाल यांच्या नेतृत्वाखाली नेमण्यात आलेल्या या समितीमध्ये लोकसभेतील भर्तृहरी महताब, तेजस्वी सूर्या, निशिकांत दुबे, ए. राजा आणि सुप्रिया सुळे या प्रमुख खासदारांचा समावेश आहे. तसंच, राज्यसभेतून हर्षवर्धन श्रृंगला, संजय कुमार झा, प्रफुल्ल पटेल आणि मेनका गुरुस्वामी यांचा समितीत समावेश करण्यात आला आहे. संसदेच्या दोन्ही सभागृहांनी 12 ऑगस्टला हे विधेयक अधिक छाननीसाठी 'संयुक्त संसदीय समिती'कडं सोपवण्यास मंजुरी दिली होती.

**श्रीकृष्ण जन्माष्टमी**

भगवान श्रीकृष्णाच्या जन्मोत्सवाचा; 'जन्माष्टमी'चा सण आज देशभरात उत्साहात साजरा केला जात आहे. उत्तर प्रदेशमध्ये मथुरा आणि वृंदावनमध्ये आज रात्री होणाऱ्या भव्य उत्सवासाठी विशेष तयारी करण्यात आली आहे. सर्व मंदिरांना आकर्षक सजावट करण्यात आली आहे. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ आज मथुरेतील जन्माष्टमी सोहळ्यात सहभागी होणार आहेत. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी नागरिकांना जन्माष्टमीच्या शुभेच्छा दिल्या आहेत. महाराष्ट्रातही सर्वत्र जन्माष्टमी निमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. विविध कृष्ण मंदिरांमध्ये भगवान श्रीकृष्णाच्या जीवनातील विविध प्रसंगांचं चित्रण करणारी सजावट करण्यात आली आहे.

**नेपाळ-मृतसंख्या**

नेपाळमध्ये पुर दुर्घटनेतल्या मृतांची संख्या 1,259 वर पोहोचली आहे, अजूनही 5,000 हून अधिक लोक बेपत्ता आहेत. या आपत्तीचा हवामान बदलाशी असलेला संबंध आंतरराष्ट्रीय समुदायासमोर ठामपणे मांडला गेला पाहिजे, असं नेपाळचे पंतप्रधान बालेन्द्र शाह यांनी म्हटलं आहे.

**नेपाळ मदत**

नेपाळमध्ये पूरग्रस्त भागात मदत आणि बचाव कार्यसाठी भारतानं आणखी मदत पाठवली आहे. मदत साहित्य घेऊन जाणारी आणखी दोन विमानं काठमांडू इथ पोहोचली असल्याचं परराष्ट्र मंत्रालयानं म्हटलं आहे.

**नेपाळ-डीएनए**

नेपाळमधील पुर दुर्घटनेनंतर, बेपत्ता व्यक्तींच्या भारतातील नातेवाईकांच्या डीएनए प्रोफायलिंगसाठी प्रयोगशाळांच्या सेवा गृह मंत्रालयाकडून उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. भारतात राहणारे नातेवाईक विशिष्ट केंद्रांवर जाऊन त्यांचे जैविक नमुने देऊ शकतात आणि डीएनए प्रोफाइल्स तयार करून घेऊ शकतात, असं परराष्ट्र मंत्रालयानं सांगितलं आहे.

**शिवराज सिंह चौहान**

महिला बचत गटांना बँकांकडून कर्ज घेताना येणाऱ्या अडचणी दूर करण्याचं आश्वासन केंद्रीय ग्रामविकास मंत्री शिवराजसिंग चौहान यांनी दिलं आहे. चौहान यांनी काल मुंबईत महिला बचत गटांच्या सदस्यांशी दूरस्थ पद्धतीनं संवाद साधला. येत्या 5 वर्षात महिला बचत गटांना 10 लाख कोटींचे कर्ज देण्याचं आणि बचत गटातल्या महिलांना 1 लाख कोटी रुपयाचं कर्ज देण्याचं उद्दिष्ट असल्याचं ते म्हणाले.

**रेल्वे-वैष्णव**

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते काल छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस इथून मुंबई-सावंतवाडी एक्स्प्रेसला हिरवा झेंडा दाखवण्यात आला. रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव तसंच केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल याप्रसंगी दूरदृश्यसंवाद प्रणालीद्वारे उपस्थित होते. गणेशोत्सव काळात प्रवाशांच्या सोयीसाठी यंदा साडे-तीनशे विशेष गाड्या चालवल्या जातील, तसंच आवश्यकतेनुसार जादा गाड्यांची व्यवस्था केली जाईल, असं अश्विनी वैष्णव यांनी सांगितलं.

**नशा मुक्त भारत**

'नशा मुक्त भारत अभियाना'च्या सहाव्या वर्धापन दिनानिमित्त या महिन्यात अंमली पदार्थांच्या गैरवापरांविरुद्ध राष्ट्रीय सामूहिक शपथ' घेतली जाणार आहे. प्रत्यक्ष आणि ऑनलाइन अशा दोन्ही माध्यमांतून 10 कोटींहून अधिक नागरिकांना यात सहभागी करून घेण्याचं या उपक्रमाचं उद्दिष्ट आहे. याबाबतच्या नियोजनावर चर्चा करण्यासाठी सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालयातील सहसचिव डॉ. संदीप राठोड यांनी काल नवी दिल्लीत दोन उच्च-स्तरीय समन्वय बैठका घेतल्या.

**बॅडमिंटन**

शेन्झेन इथं सुरू असलेल्या 'चायना मास्टर्स सुपर 750' बॅडमिंटन स्पर्धेतल्या पुरुष एकेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत भारताचा आघाडीचा खेळाडू किदाम्बी श्रीकांत याची लढत आज हाँगकाँगच्या ली चेऊक यिऊशी होणार आहे. श्रीकांतनं काल झालेल्या सामन्यात कॅनडाच्या व्हिक्टर लाईचा 21-18, 21-19 असा पराभव केला. दुसरीकडं भारताची पुरुष दुहेरीतील अव्वल जोडी असलेल्या सात्विक साईराज रँकीरेड्डी आणि चिराग शेट्टी यांनी उपांत्यपूर्व फेरीत धडक मारली आहे. मात्र, महिला एकेरीत तन्वी शर्मा हिला जपानच्या टोमोका मियाझाकीकडून

तीन गेम्सच्या लढतीत पराभव पत्करावा लागल्यानं 'राउंड ऑफ 16' मधूनच बाहेर पडावं लागले. तसंच, मिश्र दुहेरीत ध्रुव कपिला आणि तनिषा क्रास्टो यांचं आव्हानही संपुष्टात आलं.

**क्रिकेट**

महिला टी-20 आशिया चषक स्पर्धेत काल भारतानं हाँगकाँगचा 137 धावांनी पराभव करत स्पर्धेच्या उपांत्य फेरीत प्रवेश केला. प्रथम फलंदाजी करताना भारतानं 20 षटकांत 5 गडी गमावून 192 धावांचा डोंगर उभा केला. भारताकडून स्मृती मानधनानं 64 चेंडूंत 124 धावांची उत्कृष्ट खेळी केली. या आव्हानाचा पाठलाग करताना हाँगकाँगचा संघ 17 व्या षटकांत अवघ्या 56 धावांवर सर्वबाद झाला. दीप्ती शर्मानं 9 धावा देत 3, नंदानीनं 2, तर प्रेमा रावतनं 2 बळी घेतले. स्मृती मानधना हिला सामनावीर पुरस्कारानं गौरविण्यात आलं. भारताचा पुढील सामना उद्या पाकिस्तानविरुद्ध होणार आहे.

**उत्तर प्रदेश-पुर आढावा**

मुसळधार पाऊस आणि धरणातून सोडण्यात आलेल्या पाण्यामुळे उत्तर प्रदेशातील 23 जिल्ह्यांमध्ये पुरस्थिती निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जिल्हाधियकऱ्यांशी दूरध्वनीवरून संवादसाधून पूरपरिस्थितीची माहिती घेतली. तसंच काशीमधील नद्यांच्या पाणी पातळीबाबत आणि मदत छावण्यांमध्ये करण्यात आलेल्या व्यवस्थेबाबतही आढावा घेतला. चित्रकूटमध्ये मंदाकिनी नदीच्या पाणी पातळीत आणखी वाढ झाल्यामुळं, प्रशासनानं पूरग्रस्त भागातील रहिवाशांना तातडीनं सुरक्षित स्थळी स्थलांतर करण्याचं आवाहन केलं आहे.

## या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.